# वेचक

## मुंबईत पहिले 'जागतिक विश्व संमेलन'

**मुंबई :** योग, आरोग्य, वैद्यकीय उपाययोजना, पर्यावरण, अग्निहोत्र, वीजरहीत उद्योग, हरितक्रांती, स्त्रीशक्ती, ऊर्जासंवर्धन, विधी, कायदे, अणुऊर्जा, सौरऊर्जा, तंत्रज्ञान, खासगी-सरकारी समन्वय यासारखे अनेक विषय घेऊन १८ ते २० डिसेंबरदरम्यान प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात पहिले 'जागतिक विश्व संमेलन' रंगणार आहे. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम या संमेलनाचे उद्‌घाटक आहेत. 'विज्ञानयुगात हरितक्रांतीचे स्वप्न साकार होऊ शकते,' असा निर्धार या संमेलनाच्या निमित्ताने केला जाणार आहे. विविध विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, वेगवेगळ्या संस्थांचा सहभाग आणि सर्वसमावेशक परिसंवाद, विविध कार्यशाळा असे या संमेलनाचे स्वरूप असणार आहे.